Estd: 1962
NAAC ‘A’ Grade

## ❖ गुणपडताळणी/फोटोकॉपी/फेरतपासणी/ पुर्नगुणपडताळणी अर्जांबाबत विद्यार्थ्यांना सुचना :-

1. विद्यार्थ्यांनी गुणपडताळणी/फोटोकॉपी/फेरतपासणी/पुर्नगुणपडताळणी साठीचे अर्ज **ऑनलाईन पध्दतीनेच भरणे बंधनकारक आहे.** इतर कोणत्याही पध्दतीने (उदा. मॅल्युअल अर्जाद्वारे, लेखी विनंती अर्जाद्वारे,)अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
2. विद्यार्थ्यांनी गुणपडताळणी/फोटोकॉपी/फेरतपासणी/पुर्नगुणपडताळणी संदर्भातील अर्ज online.unishivaji.ac.in (Student Login) या वेबपेजवरून ऑनलाईन भरावा. **ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी सर्व प्रथम वेबसाईटवरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.**
3. विद्यार्थ्यांनी सर्व प्रथम online.unishivaji.ac.in या वेबपेज वरून (Student Login) मध्ये **New User Registration** मधून **PRN** नंबर भरून स्वतःचा युजर आयडी व पासवर्ड तयास करून घ्यावा. व त्यानंतर **Log In** करून अर्ज भरावा. युजर आयडी व पासवर्ड भविष्यात आवश्यक असल्याने विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक लक्षात ठेवावा.
4. अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक व बॅंकेबाबत माहिती अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे. गुणपडताळणी/फोटोकॉपी/फेरतपासणी/पुर्नगुणपडताळणी अर्जांची तपशीलवार माहिती **SMS** द्वारे विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल. तथापि विद्यार्थ्यांने नियमितपणे विद्यापीठाच्या वर नमूद केलेल्या लिंक वर स्वतःच्या लॉगीन मध्ये पाहणे व पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांस अन्य कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
5. दंडक १०५ अन्वये विद्यार्थ्यांना गुणपडताळणीसाठी जास्तीत जास्त प्रती सत्र **तीन** विषयांसाठी व दंडक १०६ ब अन्वये फोटोकॉपीसाठी जास्तीत जास्त प्रती सत्र **दोन** विषयांसाठी अर्ज करता येईल.
6. गुणपडताळणी/फोटोकॉपी/फेरतपासणी/पुर्नगुणपडताळणी साठी अर्ज करण्याची मुदत व फी खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | अर्ज प्रकार | अर्ज करण्याची मुदत | आकरण्यात येणारी फी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | गुणपडताळणी (Verification) | निकाल जाहिर झालेपासून १५ दिवसांपर्यंत | ५०/- (प्रती एक विषयास) | फोटोकॉपीशिवाय मुळउत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावरील व आतील गुणांच्या बेरजेची पडताळणी केली जाते. |
| २ | फोटोकॉपी (Photocopy) | निकाल जाहिर झालेपासून १५ दिवसांपर्यंत | १५०/- (प्रती एक विषयास) | विद्यार्थ्यांनी मागणी केलेल्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत(Scan Copy) विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करून दिली जाते. |
| ३ | फेरतपासणी (Revaluation) | फोटोकॉपी वितरण दिनांकापासून ०७ दिवसांपर्यंत | ५००/- (प्रती एक विषयास) | फेरतपासणीसाठी अर्ज प्राप्त झालेनंतर दंडक १०६ ‘ब’ नुसार कार्यवाही केली जाते. |
| ४ | पुर्नगुणपडताळणी (Re-Verification) | फोटोकॉपी वितरण दिनांका पासून ०७ दिवसांपर्यंत | विना मूल्य | पुर्नगुणपडताळणीसाठी अर्ज प्राप्त झालेनंतर मुळ उत्तरपत्रिकेवरून मुखपृष्ठावरील व आतील गुणांच्या बेरजेची पडताळणी केली जाते. |

7. विद्यार्थ्यांनी (अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी वगळून) गुणपडताळणी/फोटोकॉपी/ फेरतपासणी/पुर्नगुणपडताळणी चे अर्जाची प्रिंट आउट काढून परीक्षा भवन क्रमांक ०२, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे शुल्क भरून वेळेत जमा करावेत. व एक प्रत स्वतः जवळ माहितीसाठी ठेवावी.

8. सर्व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी गुणपडताळणी/फोटोकॉपी/फेरतपासणी/ पुर्नगुणपडताळणी चे अर्ज संबंधित महाविद्यालयामध्ये वेळेत जमा करावेत.
9. अपु-या अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल घेतली जाणार नाही. कृपया याची नोंद घेण्यात यावी.
10. **गुणपडताळणी/फोटोकॉपी/फेरतपासणी/पुर्नगुणपडताळणी साठी फी भरून अर्ज जमा केल्यानंतर अर्जामध्ये कोणत्याही प्रकारे दुरूस्ती करता येणार नाही. कृपया याची नोंद घेण्यात यावी.**
11. **उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी (Scan Copy) online.unishivaji.ac.in (Student Login) या वेबपेजवरील विद्यार्थ्यांच्या स्वतः च्या लॉगीनमध्ये PDF File मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.**
12. उत्तरपत्रिकेच्या फोटोकॉपी (Scan Copy) संदर्भात काही तक्रार असल्यास विद्यार्थ्यांनी उपरोक्त लिंक वरील(Student Login) या सदरातील स्वतःच्या लॉगीनमधील **Student Photocopy Feedback** या पर्याया मधून विद्यापीठास माहिती कळवावी.
13. विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास तांत्रिक अडचणीच्या तपशीलासह photocopy@unishivaji.ac.in या ई-मेल वर सविस्तर माहितीसह ई-मेल करावा.
14. **SU/PRE-ON Exam./college exam./1088 Dt. 16/01/2012 पत्रानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार बी.ए., बी.कॉम. बी.एस्सी.(सर्व शाखा), बी.बी.ए., बी.सी.ए., बी. सी.एस., बी.ए.बी.एड., बी.डेस., बी.एफ.टी.एम., बी.डी.एफ.सी., बी.आय.डी., बी.एस.डब्ल्यू. या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षातील दोन्ही सत्रांच्या (सत्र १ व २) परीक्षा महाविद्यालयाकडे सोपविण्यात आलेल्या असल्याने विद्यार्थ्यांनी गुणपडताळणी/फोटोकॉपी फेरतपासणी/पुर्नगुणपडताळणी चे अर्ज संबंधित महाविद्यालयात जमा करावेत.**

# गुणपडताळणी (Verification) अर्जाकरिता महत्वाच्या सुचना :-

1. संबंधित परीक्षेचा निकाल संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत विद्यार्थ्यांनी गुणपडताळणीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. गुणपडताळणीसाठी प्रत्येक विषयास रू. ५०/- शुल्क आकारण्यात येईल.
3. गुणपडताळणीसाठी प्रती सत्र तीन विषयांसाठी अर्ज करता येईल.
4. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये दिलेली सर्व माहिती तसचे स्वतःचा पूर्ण पत्ता, पिनकोड, ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक अचूकपणे नमूद करावा. अपूर्ण अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल घेतली जाणार नाही. कृपया याची नोंद घेण्यात यावी.
5. **चलन भरून अर्ज जमा केल्यानंतर अर्जामध्ये कोणत्याही प्रकारे दुरूस्ती करता येणार नाही. कृपया याची नोंद घेण्यात यावी.**
6. गुणपडताळणी अर्जासोबत मार्कलिस्टची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
7. विद्यार्थ्यांनी(अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी वगळुन) गुणपडताळणीचे अर्ज विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्र.२, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे लेखा विभागामध्ये फी भरून जमा करावेत.
8. फी भरल्यानंतर गुणपडताळणी च्या अर्जास चलनाची मुळ प्रत जोडून परीक्षा भवन क्रमांक २, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे अर्ज जमा करावेत.
9. सर्व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी गुणपडताळणीचे अर्ज संबंधित महाविद्यालयामध्ये जमा करावेत.
10. गुणपडताळणीचा निकाल (चेंज/नो चेंज) लॉगीनद्वारे तसेच **SMS** द्वारे विद्यार्थ्यांना अवगत करण्यात येईल. तथापी विद्यार्थ्यांनी online.unishivaji.ac.in (Student Login) या वेबपेजवरील गुणपडताळणी अर्जासंदर्भातील सद्यःस्थीती व तपशीलवार माहिती स्वतःच्या लॉगीनमध्ये नियमितपणे पाहणे आवश्यक आहे.

## फोटोकॉपी(Photocopy) अर्जा करिता महत्वाच्या सुचना :-

1. संबंधित परीक्षेचा निकाल संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत विद्यार्थ्यांनी फोटोकॉपीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. फोटोकॉपीसाठी प्रत्येक विषयास रू. १५०/- शुल्क आकारण्यात येईल.
3. फोटोकॉपीसाठी प्रती सत्र दोन विषयांसाठी अर्ज करता येईल.
4. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये दिलेली सर्व माहिती तसचे स्वतःचा पूर्ण पत्ता, पिनकोड, ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक अचूकपणे नमूद करावा. अपूर्ण अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल घेतली जाणार नाही. कृपया याची नोंद घेण्यात यावी.
5. **चलन भरून अर्ज जमा केल्यानंतर अर्जामध्ये कोणत्याही प्रकारे दुरूस्ती करता येणार नाही. कृपया याची नोंद घेण्यात यावी.**
6. फोटोकॉपी अर्जासोबत मार्कलिस्टची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
7. विद्यार्थ्यांनी(अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी वगळुन) फोटोकॉपीचे अर्ज विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्र.२, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर मधून चलन भरण्याचे रिमार्क घेवून रूम नं. १०७, लेखा विभाग, मुख्य इमारत, शिवाजी विद्यापीठ येथे चलन भरावे.
8. चलन भरल्यानंतर फोटोकॉपी च्या अर्जास चलनाची मुळ प्रत जोडून परीक्षा भवन क्र. २, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे अर्ज जमा करावेत.
9. सर्व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी फोटोकॉपीचे अर्ज संबंधित महाविद्यालयामध्ये जमा करावेत.
10. विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी (Scan Copy) online.unishivaji.ac.in (Student Login) या वेबपेजवरील स्वतःच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.
11. उत्तरपत्रिकेच्या फोटोकॉपी (Scan Copy) संदर्भात काही तक्रार असल्यास विद्यार्थ्यांनी online.unishivaji.ac.in (Student Login) या वेबपेजवरील स्वतःच्या लॉगीनमधील Student Photocopy Feedback या option मधून विद्यापीठास माहीती कळवावी.
12. विद्यार्थ्यांना **SMS** द्वारे फोटोकॉपी अर्जासंदर्भातील व वितरणाबाबतची सर्व माहिती अवगत करण्यात येईल. तथापी विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी अर्जासंदर्भातील सद्यःस्थीती व तपशीलवार माहिती online.unishivaji.ac.in (Student Login) या वेबपेजवरून स्वतःच्या लॉगीनमध्ये नियमितपणे पाहणे आवश्यक आहे.

## फेरतपासणी(Revaluation) अर्जा करिता महत्वाच्या सुचना :-

1. विद्यार्थ्यांना ज्या विषयांचे फेरतपासणी(Revaluation) करावयाचे आहे त्या विषयांची सर्वप्रथम फोटोकॉपी घेणे आवश्यक आहे.
2. **फोटोकॉपी वितरण दिनांकापासून ०७ दिवसांच्या आत फेरतपासणीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.**
3. फेरतपासणीसाठी प्रत्येक विषयास रू. ५००/- शुल्क आकारण्यात येईल.
4. विद्यार्थ्यांनी ज्या विषयांची फोटोकॉपी घेण्यात आली आहे त्याच विषयांसाठी फेरतपासणीसाठी अर्ज करता येईल.
5. **एकदा फी जमा झाल्यानंतर अर्जामध्ये कोणत्याही प्रकारे दुरूस्ती करता येणार नाही. कृपया याची नोंद घेण्यात यावी.**
6. विद्यार्थ्यांनी संबंधित विषयाचे ग्रीव्हेन्स्(तक्रार) व जस्टीफीकेशन (स्वतःचा खुलासा) स्वतःच्या लॉगीनमधून ऑनलाईन भरणे बंधनकारक आहे.
7. फेरतपासणी अर्जासोबत ग्रीव्हेस व जस्टीफीकेशन फॉर्म व मार्कलिस्टची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. फेरतपासणी अर्जासोबत ऑनलाईन पाठविण्यात आलेल्या फोटोकॉपीची झेरॉक्स प्रत जोडण्याची आवश्यकता नाही.
8. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये दिलेली सर्व माहिती तसचे स्वतःचा पूर्ण पत्ता, पिनकोड, ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक अचूकपणे नमूद करावा. अपूर्ण अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल घेतली जाणार नाही. कृपया याची नोंद घेण्यात यावी.
9. विद्यार्थ्यांनी(अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी वगळुन) फेरतपासणीचे अर्ज विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्र.२, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे शुल्क भरून वेळेत जमा करावेत.
10. सर्व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी फेरतपासणी अर्ज संबंधित महाविद्यालयामध्ये जमा करावेत.
11. फेरतपासणीचा निकाल (चेंज/ नो चेंज) लॉगीनद्वारे तसेच **SMS** द्वारे विद्यार्थ्यांना अवगत करण्यात येईल. तथापी विद्यार्थ्यांनी फेरतपासणी अर्जासंदर्भातील सद्यःस्थीती व तपशीलवार माहिती online.unishivaji.ac.in (Student Login) या वेबपेजवरून स्वतःच्या लॉगीनमध्ये नियमितपणे पाहणे आवश्यक आहे.

# पुर्नगुणपडताळणी(Re-verification) अर्जा करिता महत्वाच्या सुचना :-

1. फोटोकॉपी वितरण दिनांकापासून **०७ दिवसांच्या आत** फेरतपासणीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. विद्यार्थ्यांनी ज्या विषयांची फोटोकॉपी घेण्यात आली आहे त्याच विषयांसाठी पुर्नगुणपडताळणीसाठी अर्ज करता येईल.
3. **पुर्नगुणपडताळणी अर्जासाठी शुल्क विनामुल्य आहे.**
4. एकदा भरलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारे दुरूस्ती करता येणार नाही.
5. विद्यार्थ्यांनी संबंधित विषयाचे जस्टीफीकेशन(Errors observed) लॉगीनमधून ऑनलाईन भरणे बंधनकारक आहे.
6. पुर्नगुणपडताळणी अर्जासोबत जस्टीफीकेशन(Errors observed) व मार्कलिस्टची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. पुर्नगुणपडताळणी अर्जासोबत ऑनलाईन पाठविण्यात आलेल्या फोटोकॉपीची झेरॉक्स प्रत जोडण्याची आवश्यकता नाही.
7. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये दिलेली सर्व माहिती तसचे स्वतःचा पूर्ण पत्ता, पिनकोड, ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक अचूकपणे नमूद करावा. अपूर्ण अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल घेतली जाणार नाही. कृपया याची नोंद घेण्यात यावी.
8. सर्व विद्यार्थ्यांनी(अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी वगळुन) पुर्नगुणपडताळणी अर्ज विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्र.२ येथे वेळेत जमा करावेत.
9. सर्व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी पुर्नगुणपडताळणी अर्ज संबंधित महाविद्यालयामध्ये वेळेत जमा करावेत.
10. पुर्नगुणपडताळणीचा निकाल (चेंज/ नो चेंज) लॉगीनद्वारे तसेच **SMS** द्वारे विद्यार्थ्यांना अवगत करण्यात येईल. तथापी विद्यार्थ्यांनी पुर्नगुणपडताळणी अर्जासंदर्भातील सद्यःस्थीती व तपशीलवार माहिती online.unishivaji.ac.in (Student Login) या वेबपेजवरून स्वतःच्या लॉगीनमध्ये नियमितपणे पाहणे आवश्यक आहे.